**L. A. BILL No. XCIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३.**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९६४ चा १० महा. २०. २०२५ चा महा. अध्या. ९.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

१९६४ चा महा. २०.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (ज) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ज-१) "राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार" म्हणजे, कलम ५-१अ अन्वये स्थापन केलेला राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार;";

(२) खंड (के) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (के-१) "राष्ट्रीय कृषि बाजार" म्हणजे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे, कृषि उत्पन्नांची खरेदी व विक्री केली जाते आणि तदानुषंगिक कार्ये, एकतर, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा अन्यथा पार पाडली जातात असा वेळ व स्थळ विशिष्ट पणन उपयुक्तता असणारा भारतातील एकात्मिक बाजार;";

(३) खंड (ट) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ट-१) "एकीकृत एकल व्यापार लायसन" म्हणजे, राज्यांतर्गत किंवा आंतरराज्यीय व्यापारासाठी कलम ७अ अन्वये दिलेले किंवा कलम ७ब अन्वये मान्यताप्राप्त असलेले एकीकृत एकल व्यापार लायसन;".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या प्रकरण एक-अ नंतर नवीन प्रकरण समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण एक-अ नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :—

" प्रकरण एक-१अ

**राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराची स्थापना**

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराची स्थापना.

**५-१अ.** (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, प्रक्रियांतर्गत मालाचे मूल्य, प्रतिवाही पाणलोट क्षेत्र, सेवा पुरविलेल्या ग्राहकांची अनुवाही संख्या आणि त्यासाठी विशेष पायाभूत सोयीसुविधांच्या आवश्यकता, राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचे आवश्यक विनियमन यांसारखे कृषि उत्पन्नाच्या पणनाशी संबंधित असणारे पैलू विचारात घेतल्यानंतर, कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यमान बाजारास, "राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार" म्हणून निर्देशित करू शकेल किंवा कोणत्याही बाजाराची "राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार" म्हणून स्थापना करू शकेल :

परंतु, ऐंशी हजार मेट्रिक टनांपेक्षा कमी नसेल इतक्या कृषि उत्पन्नाची अथवा शासनाकडून आदेशाद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वार्षिक टनभाराची किंवा अशा वार्षिक मूल्याची, उलाढाल असणाऱ्या आणि ज्यामध्ये, दोनपेक्षा कमी नसतील इतक्या अन्य राज्यांमधून कृषि उत्पन्न येते अशा बाजाराचा, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार म्हणून विनिर्देश करण्यासाठी विचार करता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारातील पणनाचे विनियमन, विहित करण्यात येईल, अशा रीतीने करण्यात येईल.

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या बाजार समितीची रचना.

**५-१ब.** (१) राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या बाजार समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल:-

(एक) पणन मंत्री- अध्यक्ष;

(दोन) पणन राज्यमंत्री - उपाध्यक्ष;

(तीन) कृषि आयुक्त किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा प्रतिनिधी;

(चार) पणन संचालक किंवा सहकार विभागाच्या सहनिबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा प्रतिनिधी;

(पाच) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे किंवा सहकार विभागाच्या सहनिबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा प्रतिनिधी;

(सहा) ज्या महसूल विभागात राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार स्थित असेल त्या विभागातील चार शेतकरी, त्यांपैकी दोन शेतकरी, बाजार समितीच्या क्षेत्रातील असतील (त्यांपैकी एक, महिला असेल आणि एक, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती यांमधील व्यक्ती असेल);

(सात) आवश्यक असल्यास, जेथून राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारआवारामध्ये जास्तीत जास्त कृषि उत्पन्नाची आवक होते, त्या अन्य राज्य शासनाद्वारे शिफारस केलेले, महाराष्ट्र राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे, दोन शेतकरी (दोन अन्य राज्यांमधील प्रत्येक एक शेतकरी) ;

(आठ) राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराशी संबंधित असलेल्या व्यापाराचे लायसन धारण करणारे तीन सदस्य, त्यापैकी एक, जिला संचालक म्हणून तीन वर्षांचा अनुभव आहे अशी कृषि प्रक्रिया उद्योगांमधील व्यक्ती किंवा संबंधित प्रक्रिया उद्योगातील भागीदार (त्यांपैकी एक, महिला असेल आणि एक, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती यांमधील व्यक्ती असेल);

(नऊ) जी व्यक्ती, वित्त, पणन, सहकार, व्यवस्थापन किंवा आयात-निर्यात या क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रामधील तज्ञ आहे, अशी शासनाद्वारे नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती.

(२)(अ) बाजार समिती, तिला सहाय्य करण्याच्या किंवा कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी विशेष निमंत्रित म्हणून पुढील व्यक्तींना निमंत्रित करू शकेलः—

(एक) भारत सरकारच्या संबंधित प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्यानंतर, कृषि व प्रक्रियाकृत खाद्य उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाचा (अपेडा) एक प्रतिनिधी;

(दोन) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक किंवा त्याचा प्रतिनिधी (जो, सहकार विभागाच्या सहनिबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल);

(तीन) जेथे राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार स्थित आहे त्या क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रशासकीय प्रमुख किंवा त्याने नामनिर्देशित केलेला गट-अ दर्जाच्या अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी .

(ब) अशा विशेष निमंत्रित व्यक्ती, समितीच्या बैठकींमध्ये भाग घेऊ शकतील, परंतु, त्यांना, मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(३) जो, सहकार विभागाच्या सहनिबंधकाच्या पदाशी समकक्ष असलेले पद धारण करीत असेल, असा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला, कृषि, पणन, सहकार, महसूल विभागातील अधिकारी किंवा इतर कोणत्याही विभागातील शासकीय अधिकारी, बाजार समितीचा सचिव असेल.

(४) राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या बाजार समितीचे सदस्य म्हणून राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती, नामनिर्देशनाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा राज्य शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करतील.

(५) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाद्वारे, कलम ५-१अ अन्वये, राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या स्थापनेची अधिसूचना काढण्यात आल्याबरोबर, विद्यमान बाजार समिती, कार्य करण्याचे बंद करील आणि विद्यमान बाजार समितीचे सर्व सदस्य, त्यांचे पद धारण करण्याचे बंद करतील.

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या बाजार समितीची कार्यकारी समिती.

**५-१क.** (१) राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या बाजार समितीची दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्यासाठी विहित करण्यात येईल अशा व्यक्तींचा समावेश असलेली कार्यकारी समिती असेल.

(२) बाजार समितीस, तिचे अधिकार व कर्तव्ये यापैकी, कोणतेही अधिकार व कर्तव्ये, लेखी आदेशाद्वारे, कार्यकारी समितीकडे सोपविता येतील.

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारास विवक्षित कलमे लागू असणे.

**५-१ड.** कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या बाजारपेठांना लागू असलेल्या या अधिनियमाच्या तरतुदी, कलम १२ च्या पोट-कलम (१) चे परंतुक व कलमे १२(३), १३, १४, १४अ, १५, १५अ, १६, १७, १८, १९, २०, २१, २१अ, २२, २३, २३अ, २४, २५, २६, २७, २७अ, २८, ४१अ व ४५ यांच्या तरतुदी खेरीज करून, राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारास लागू असतील.".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम ५ड ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ड मध्ये, पोट-कलम (६) मधील, खंड (अ) मध्ये, "कलम २९ चे पोट-कलम (२)" या मजकुराआधी, "कलम ७अ, कलम १०अ," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील, "कलम ५ड मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज, कोणत्याही लायसनची किंवा परवानगीची आवश्यकता भासणार नाही, आणि अशा पणनाचे बाजार समितीकडून विनियमन केले जाणार नाही." या मजकुराऐवजी, "कलम ५ड मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लायसन अथवा बाजार समितीकडून कोणतेही लायसन किंवा परवानगी आवश्यक असेल, तथापि, बाजार समितीद्वारे अशा लायसनधारकाकडून कोणतेही बाजार शुल्क आकारण्यायोग्य असणार नाही." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (३) वगळण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० मध्ये नवीन कलमे ७अ व ७ब समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

एकीकृत एकल व्यापार लायसन देणे.

“**७अ.** (१) राज्यातील कोणत्याही प्रमुख बाजारआवारात, उप बाजारआवारात, खाजगी बाजारआवारात आणि ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर किंवा या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या इतर कोणत्याही जागेत व्यापारी म्हणून काम करण्यासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा नमुन्यात, संचालकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने द्यावयाचे किंवा नूतनीकरण करावयाचे, व्यापाऱ्याकरिता संपूर्ण राज्यासाठी एक एकीकृत एकल व्यापार लायसन असेल.

(२) व्यापारी म्हणून पोट-कलम (१) अन्वये एकीकृत एकल व्यापार लायसन मिळवू किंवा त्याचे नूतनीकरण करू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा शुल्कासह संचालकाकडे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(३) संचालक किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, पोट-कलम (२) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, या अधिनियमाच्या तरतुदी आणि याबाबतीत केलेले नियम यांस अधीन राहून, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी लायसन देऊ शकेल किंवा त्याचे नूतनीकरण करू शकेल :

परंतु, या अधिनियमात आणि त्या खाली केलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असे लायसन देण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी अधिवास, खरेदीची किंवा संकलन केंद्राची अनिवार्य आवश्यकता किंवा किमान परिमाण यांचा विचार केला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, दिलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या अशा लायसनमुळे लायसनधारकाने, कोणत्याही भेदभावाविना कोणत्याही स्वरूपाचा, म्हणजेच, प्राथमिक किंवा दुय्यम अथवा अन्य कोणताही व्यापार करणे भाग असेल.

(४) या कलमान्वये संचालकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या एकीकृत एकल व्यापार लायसनवर विहित करण्यात येईल असा संकेतांक (युनिकोड) उमटविलेला असेल.

आंतरराज्य व्यापारासाठी अन्य राज्यांनी किंवा संघराज्य क्षेत्रांनी दिलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या एकीकृत एकल व्यापार लायसनची मान्यता.

**७ब.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य, अन्य कोणत्याही राज्याने किंवा संघराज्य क्षेत्राने दिलेल्या, संकेतांक (युनिकोड) उमटविलेल्या एकीकृत एकल व्यापार लायसनच्या धारकाला, विहित करण्यात येईल अशा रीतीने, कार्यरत असेल अशा ई-प्लॅटफॉर्मवर किंवा प्रत्यक्ष स्वरूपासह इतर कोणत्याही स्वरूपात, त्याच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रात, व्यापारी म्हणून व्यापार व्यवहार करण्याची परवानगी देऊ शकेल.

(२) असा लायसनधारक, ज्या राज्यात व्यापार व्यवहार केला जात आहे, त्या राज्यात लागू असलेल्या दराने, विहित करण्यात येईल अशा रीतीने, बाजार शुल्क आणि इतर पणन आकार प्रदान करण्यास पात्र असेल.”.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात येईल :—

“(४) जर या कलमान्वये लायसन निलंबित किंवा रद्द केले असेल तर, असा लायसनधारक, ते लायसन तात्काळ बाजार समितीच्या किंवा संचालकाच्या, किंवा यथास्थिति, त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या कार्यालयात सादर करील, आणि तो, असे निलंबन किंवा रद्द करण्यामुळे कोणत्याही भरपाईची किंवा लायसन शुल्काच्या संपूर्ण किंवा अंशतः परताव्याची किंवा इतर कोणत्याही पैशाची कोणतीही हक्क मागणी करण्यास हक्कदार असणार नाही.”.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १० ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (७) ज्याला महाराष्ट्राच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रात ई-प्लॅटफॉर्मवर किंवा कार्यरत असू शकेल अशा भौतिक प्रकारासह इतर कोणत्याही प्रकारात, व्यापारी म्हणून व्यापार व्यवहार करण्यास परवानगी दिलेली आहे असा एकीकृत एकल व्यापार लायसनधारक, विक्रेता, शेतकरी, बाजार समिती व अन्य राज्ये किंवा संघराज्य क्षेत्रे यांचे एकीकृत एकल व्यापार लायसनधारक यांच्यामध्ये किंवा त्यांच्यामध्ये उद्‌भवणारा कोणताही विवाद, तसेच कोणत्याही कृषि उत्पादनाची गुणवत्ता किंवा वजन किंवा प्रदान यासंबंधीचा कोणताही विवाद, अथवा कृषि उत्पादनाच्या पणनाचे विनियमन करण्याच्या संबंधातील कोणतीही बाब, पक्षकारांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, संचालकाद्वारे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याद्वारे, तीस दिवसांच्या आत, संक्षिप्तरीत्या सोडविता येऊ शकेल.

(८) पोट-कलम (७) अन्वये संचालकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, राज्य शासनाकडे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे अपील करता येईल. अपील प्राधिकरण, पक्षकारांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अपील निकालात काढील.".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३४अ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "राज्य शासनास," या मजकुराऐवजी, "संचालकास," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**११.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

२०२५ चा महा. अध्या. ९.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

**१२.** (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

し

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

बाजार क्षेत्रांतील आणि खाजगी बाजारांसह बाजारांमधील आणि त्यासाठी राज्यामध्ये स्थापन केलेल्या शेतकरी ग्राहक बाजारांमधील शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीचा विकास व विनियमन करण्यासाठी, बाजार समित्यांना अधिकार प्रदान करण्यासाठी आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) अधिनियमित केला आहे.

२. शेतकऱ्यांच्या कृषि उत्पन्नास चांगला भाव मिळावा यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. प्रचलित लिलाव व्यवस्थेत सातत्य राखण्यासाठी व पारदर्शकता आणण्यासाठी आणि कृषि उत्पन्नाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी, केंद्र सरकारने, कृषि उत्पन्नाची खरेदी व विक्री करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एकच बाजारपेठ असावी या संकल्पनेवर आधारित ई-राष्ट्रीय कृषि बाजार योजना (ई-नाम) सुरू केली आहे.

कृषि उत्पन्नाच्या व्यापारातील अडथळे कमी करण्यासाठी आणि राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना, त्यांच्या कृषि उत्पन्नाला चांगला भाव मिळावा यासाठी, ई-राष्ट्रीय कृषि बाजार योजना (ई-नाम) राबविण्यात आली आहे. तथापि, उक्त अधिनियमात एकल एकीकृत व्यापार लायसनची तरतूद नसल्यामुळे, संपूर्ण राज्यासाठी, ई-नाम योजनेअंतर्गत, आंतरबाजार व आंतरराज्यीय व्यापार यांमध्ये ई-राष्ट्रीय कृषि बाजार योजनेची अंमलबजीवणी करता येऊ शकली नाही. राज्यामध्ये, ई-नाम योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, राज्यभर कृषि उत्पन्नांच्या व्यापारासाठी आणि इतर राज्यांनी तशी मान्यता दिलेली असेल तर, आंतरराज्य व्यापारासाठी देखील एकल एकीकृत लायसन देण्यासाठी तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटले.

३. ज्या कोणत्याही विद्यमान बाजाराची उलाढाल ऐंशी हजार मेट्रिक टन कृषि उत्पनापेक्षा कमी नाही आणि ज्यामध्ये, दोनपेक्षा कमी नसतील इतक्या अन्य राज्यांमधून कृषि उत्पन्न येते, अशा कोणत्याही विद्यमान बाजारामध्ये पायाभूत सुविधांची विशेष आवश्यकता आणि कृषि उत्पन्नाच्या विक्रीच्या चांगल्या सुविधांची गरज विचारात घेऊन, त्याची राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार म्हणून स्थापना करणे किंवा अशा कोणत्याही बाजाराची, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार म्हणून स्थापना करणे, आवश्यक आहे असे वाटले.

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या बाजार समितीची आणि अशा बाजार समितीची दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्यासाठी कार्यकारी समितीची स्थापना करण्यासाठी देखील तरतूद केली आहे.

४. एकात्मिक एकल व्यापारी लायसनधारक, शेतकरी, विक्रेता व बाजार समिती यांच्यातील आणि त्यांच्यामधील कोणत्याही कृषि उत्पन्नाची गुणवत्ता किंवा वजन किंवा रक्कम प्रदान करण्याच्या संबंधातील विवाद सोडविण्यासाठी तरतूद केली आहे.

५. राज्यातील शेतकऱ्यांना, कृषि उत्पन्नाच्या स्पर्धात्मक किमतींचा जास्तीत जास्त लाभ मिळेल याची या सुधारणांमुळे, सुनिश्चिती होईल.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. ९), हा प्रख्यापित केला होता.

७. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५.

**जयकुमार रावल,**
पणन मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ३.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ या मध्ये, कलमे ५-१ अ, ५-१ ब आणि ५-१ क यांचा अंतर्भाव असणारे नवीन प्रकरण सामाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,—

(एक) कलम ५-१ अ मध्ये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विद्यमान बाजारास, "राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार" म्हणून निर्देशित करण्याचे आणि राष्ट्रीय महत्त्वाचा बाजारातील पणनाचे विनियमन करण्याची रित नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार,राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(दोन) कलम ५-१ क मध्ये, कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून व्यक्ती नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७.**—या खंडान्वये,—

(एक) उक्त अधिनियमांमध्ये नवीन कलम ७अ समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, एकिकृत एकल व्यापार लायसन्स मिळण्यासाठीच्या अर्जाचा नमुना आणि त्यासाठीचे शुल्क आणि अशा लायसन्ससाठीची रीत, नमुना आणि अशा लायसन्ससाठीचा कालावधी आणि त्यासाठीचा संकेतांक, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(दोन) उक्त अधिनियमांमध्ये नवीन कलम ७ब समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, अन्य कोणत्याही राज्याने किंवा संघराज्य क्षेत्राने दिलेल्या एकिकृत एकल व्यापार लायसन्सच्या धारकाला, व्यापारी म्हणून त्याच्या भौगोलिक क्षेत्रात व्यापार करण्याची रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ९.**—या खंडान्वये, उक्त अधिनियमांतील कलम १० मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, राज्य शासनाकडे अपील ज्या नमुन्यात व ज्या रीतीने करता येईल तो नमुना व ती रीत, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ११.**—या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.

# सन २०२५चे वि.स. विधेयक क्र. ९३ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५.

( महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यातील उतारे )
(सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०)

**१. ते ५.** ** ** ** ** थेट पणनं, खाजगी बाज़ार आणि शेतकरी -ग्राहक बाजार यांची स्थापना आणि विवादांचे निराकरण

**५-अ ते ५ क.** ** ** ** **

**५- ड** (१) ते (५) ** ** ** **

(६) (अ) कलम २९ चे पोट-कलम (२) याचे खंड (एक), (दोन), (चार), (पाच), (सहा). (सात), (आठ), (नऊ), (दहा), (अकरा), (बारा), (तेरा), (वीस); (एकवीस), (पंचवीस) व (सव्वीस), कलम ३१ ची पोट-कलमे (१), (३) व (४) आणि कलमे ३२-अ, ३४ अ, ३९, ४०, ४१, ४२, ४८, ४९. ५०, ५१, ५२, ५२-अ, ५६ ५७ व ५९-ब योग्य त्या फेरफारांसह थेट पणन लायसनधारक, खाजगी बाजार व शेतकरी - ग्राहक बाजार यांना लागू होतील.

(ब) ** ** ** **

(७) ** ** ** **

**५-इ ते ५-म** ** ** ** **

**६.** (१) व (२) ** ** ** ** कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन.

"(२अ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीस, कलम ५ अन्वय स्थापन केलेल्या बाजाराबाहेर, अनुसूचीतील बाब (सात) फळे आणि (आठ) भाजीपाला यांखालील सर्व नोंदीत, आणि बाब (दहा) व्यंजने, मसाल्याचे व इतर पदार्थ याखालील नोंदी (२), (३), (४) आणि (५) यात विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, कलम ४५ मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज, कोणत्याही लायसनची किंवा परवानगीची आवश्यकता भासणार नाही, आणि अशा पणनाचे बाजार समितीकडून विनियमन केले जाणार नाही. ".

(३) ** ** ** **

**७.** (१) बाजार समितीस, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी केलेल्या नियमांच्या अधीनतेने, कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागेचा उपयोग करण्याकरिता किंवा कृषि उत्पन्नाच्या पणनाच्या संबंधात, व्यापारी, अडत्या, दलाल, प्रक्रियाकार, तोलारी, मापारी, सर्वेक्षक, वखारवाला म्हणून किंवा इतर कोणत्याही नात्याने, त्या ठिकाणी काम करण्यासाठी लायसन देता येईल किंवा त्याचे नवीकरण करता येईल; किंवा त्याबाबतची आपली कारणे लेखी नमूद करून, असे कोणतेही लायसन देण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देता येईल. लायसन्स देणे.

[३] [ परंतु, लायसनकरिता किंवा त्याच्या नवीकरणाकरिता केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून सांठ दिवसांच्या अवधीत असे लायसन देण्यात किंवा त्याचे नवीकरण करण्यात किंवा त्यास नकार देण्यास बाजार समिती कसूर करील तर असे लायसन यथास्थिति, देण्यात आल्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. ]

.

(२) पोट-कलम (१) खालील लायसने ही, विहित करण्यात येतील अशा नमुन्यात, अशा कालावधीसाठी, अशा अटींवर व शर्तीवर व असे निर्बंध घालून (त्यामध्ये दलालांनी व अडत्यांनी कोणत्याही संव्यवहारात खरेदीदार किंवा विक्रेता या दोन्ही नात्यांनी काम करणाऱ्यास किंवा खरेदीदार व विक्रेता या दोघांच्या वतीने काम करण्यास मनाई करण्यासंबंधीच्या कोणत्याही तरतुदींचा आणि तसेच कुक्कुट, गुरे-ढोरे, मेंढ्या व बकऱ्या यांहून अन्य कृषि उत्पन्नाच्या संबंधातील 'व विहित करण्यात येईल अशा इतर कृषि उत्पन्नाच्या संबंधातील व्यापाऱ्या-व्यापाऱ्यामध्ये होणाऱ्या संव्यवहाराखेरीज इतर कोणत्याही संव्यवहारात दलालांनी कार्य करण्यास मनाई करण्यासंबंधीच्या आणि कोणत्याही बाजारात किंवा बाजार क्षेत्रात ज्या रीतीने व ज्या जागी कृषि उत्पन्नाचे लिलाव करण्यात येतील आणि बोली बोलण्यात व स्वीकारण्यात येईल ती रीत व त्या जागा आणि त्या जागी कृषि उत्पन्नाचे वंजन करण्यात येईल व ते सुपूर्द करण्यात येईल त्या जागा विहित करण्यासंबंधीच्या तरतुदींचा अंतर्भाव होतो) आणि विहित करण्यात येईल अशा कमाल रकमेहून अधिक नसेल इतकी फी दिल्यानंतर, देता येतील. [१][तसेच विहित करण्यात येतील अशा अटींवर व शर्तीवर, व्यक्तींच्या कोणत्याही वर्गास अशी फी देण्याची माफी देण्यासंबंधीसुद्धा तरतूद करता येईल; ]

[२] [(३) पोट-कलम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रांमध्ये व्यापार करण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यास, लायसन देण्याकरिता किंवा त्याचे नवीकरण करण्याकरिता, राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या अशा प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा तपशिलासह, अर्ज करता येईल. अशा अर्जामध्ये, अर्जदार व्यापारी ज्यांमध्ये व्यापार करण्यास इच्छुक असेल अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या नावांचा समावेश असेल आणि असे लायसन देणारा प्राधिकारी किंवा अधिकारी, संबंधित व्यापारी ज्यामध्ये व्यापार करण्यास हक्कदार असेल अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांची नावे लायसनमध्ये समाविष्ट करील. एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रांत व्यापार करण्यासाठी लायसन मिळण्याकरिता अर्ज करणाऱ्या व्यक्तीस, संबंधित प्राधिकाऱ्याकडे, किंवा अधिकाऱ्यांकडे, विहित करण्यात येईल अशा दराने लायसन फी भरावी लागेल आणि अशी फी, असा प्राधिकारी किंवा यथास्थिति, अधिकारी आणि उक्त लायसनच्या कक्षेत येणाऱ्या पणन समित्या यांच्यामध्ये विहित रीतीने वाटून घेण्यात येईल. ]

"(४) (अ) या कलमाची पोट-कलमे (१), (२) व (३) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठावरून व्यापार करण्यास इच्छुक असणारी कोणतीही व्यक्ती, याबाबतीत

विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशा प्राधिकाऱ्याकडून व्यापारी म्हणून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करील.

(ब) खंड (अ) अन्वये नोंदणी करण्यासाठीचा अर्ज ऑनलाईन आणि विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशा नमुन्यात करण्यात येईल.

(क) डिजिटल स्वाक्षरी असलेले नोंदणी प्रमाणपत्र, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्गमित करण्यात येईल.

(ड) या पोट-कलमाच्या खंड (अ) ते (क) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकाऱ्याचे असे मत असेल की, एखादी व्यक्ती ही ऑनलाईन व्यापार करताना अहितकारी कृती करीत असल्याचे आढळून आले आहे, किंवा कोणतेही सबळ कारण न देता त्या व्यक्तीने सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी व्यापार केलेला नाही किंवा तिची बँकेतील गतिशील रोख पत मर्यादा संपली आहे किंवा विक्रेता, खरेदीकर्ता, कमिशन अडत्या, पर्यवेक्षण परिव्यय, बाजार शुल्क व अधिनियम, नियम व उपविधि याअन्वये कोणतीही अन्य प्रदाने, यांचा ऑनलाईन भरणा करण्यास कसूर केली आहे, तर त्यास कारणे लेखी नमूद करून व्यापार करण्यासाठीचे नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी किंवा त्याचे नवीकरण करण्यासाठी नकार देता येईल. नोंदणी किंवा नोंदणीचे नवीकरण, कोणतेही असल्यास, मान्य करण्यात आले नाही तर, अर्जदारास त्याबाबतची कारणे नमूद करून तसे कळवण्यात येईल आणि नोंदणी शुल्क भरले असेल तर, ते बाजार निधीत किंवा यथास्थिति, राज्य शासनाकडे सरकारजमा करण्यात येईल.

(ई) इलेक्ट्रॉनिक व्यापार करण्यासाठी ज्या व्यक्तीच्या नावाने नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याच व्यक्तीच्या बाबतीत ते वैध असेल आणि ते प्रमाणपत्र अहस्तांतरणीय असेल.

(फ) जर, -

(एक) पारदर्शकता आणि उचित रीतीने किंमत शोधन याबाबतच्या, नियमांचा भंग केला असेल; किंवा

(दोन) उपलब्ध असलेल्या रोख कर्ज मर्यादेपेक्षा लबाडीने अत्यधिक व्यापार करीत असेल; किंवा

(तीन) व्यापारी वस्तू व अधिनियम, नियम व उपविधि याअन्वये इतर प्रदाने यांसाठी तत्कालीन दराच्या आधारे ऑनलाईन भरणा करण्यास नकार दिला असेल किंवा फसवेगिरी करून नकार दिला असेल ;

तर सदर नोंदणी प्रमाणपत्र निलंबित किंवा रद्द होण्यास पात्र असेल.

(ग) अशा प्रकारे देण्यात आलेले किंवा नवीकरण केलेले प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्र हे, ते दिल्याच्या किंवा त्याचे नवीकरण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे इतक्या कालावधीपर्यंत अंमलात असेल.

(ह) इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठ असणारी प्रत्येक बाजार समिती आणि खाजगी बाजार, बाजारात इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठाचा वापर करण्याची नोंदणी असणाऱ्या व्यापाऱ्यांकरिता, सर्व नोंदणी प्रमाणपत्रांची सूची ऑनलाईन प्रसिद्ध करील.".

**८.** ते **३४.** ** ** ** **

कोणत्याही बाजारातील किंवा बाजार क्षेत्रांतील कृषि उत्पन्नाच्या खरेदीवारील पर्यवेक्षण व पर्यवेक्षणाचा परिव्यय खरेदीदारांनी देणे

**३४-अ.** (१) राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, कोणत्याही बाजारातील किंवा बाजारक्षेत्रांतील ज्या कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन या अधिनियमान्वये होत असेल अशा कृषि उत्पन्नाची खरेदी राज्य शासनास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, ते नेमील अशा कर्मचारीवर्गाच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावे; आणि या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीनतेने, अशा पर्यवेक्षणाचा परिव्यय, अशा बाजारात किंवा बाजार क्षेत्रात असे उत्पन्न खरेदी करणाऱ्या व्यक्तीने राज्य शासनास द्यावे.

(२) ** ** ** **

**३४-ब** ते **३४-ड** ** ** ** **

**३५.** ते **६६.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ ]**

**[ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. जयकुमार रावल,**
पणन मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव- १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.